**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १२०/२०१६ मधील निशाणी क्र. ५१ वरील आदेश</u>**

( पांडु शेळके व इतर वि. अहिलाजी शेळके व इतर)

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ४ लहानु कोंडाजी राउत हयांच्या विरुध्द दावा अवसायन पावल्याचा आदेश रदद् होणेकरीता अर्ज दाखल करणेस झालेला उशिर माफ होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** प्रतिवादी क्रमांक ४ लहानु कोंडाजी राउत यांचा मुत्यु दिनांक १५. ०७.२०२५ रोजी झाला आहे. कायदेशीर तरतुदींप्रमाणे सदर प्रतिवादी क्र. ४ चे कायदेशिर प्रतिनिधी दिनांक १५.१०.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, तसे न केल्यामुळे प्रतिवादी क्र. ४ चा दावा अवसायन पावला आहे. कायदेशिर तरतदुींप्रमाणे दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता प्रस्तुत अर्ज दि.१५.१२.२०२५ किंवा त्यापुर्वी दाखल करणे आवश्यक होते. परंतु वादींनी प्रस्तुत अर्ज दिनांक ०९.०१.२०२६ रोजी दाखल केला आहे. दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता मुदत अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे अर्जदारास प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास २५ दिवसांचा विलंब झाला आहे.

**०४.** वादींनी अर्जामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ४ यांचा मृत्युदाखला व त्यांच्या वारसांची माहिती नसल्याने त्यांना कायदेशिर मुदतीमध्ये प्रतिवादी क्रमांक ४ चे कायदेशिर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याकरीता कार्यवाही करता आली नाही. वादीने नमूद केलेले प्रस्तुत कारण योग्य व प्रामाणिक असल्याचे दिसून येते. सबब, प्रतिवादी क्रमांक ४ विरुध्द दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्ज दाखल करणेस झालेला विलंब माफ करणे मला न्यायोचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ४ विरुध्द दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.05.08 13:08:47 +0530

स्थळः— इगतपुरी
दिनांकः— ०८/०५/२०२६

( मो. द. ननवरे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.